माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०८१०/२२/अ.क्र.४१९१/२५/०१**

**श्रीम. रेश्मा रमेश नेयरेकर**
स्वप्नपूर्ती सहकारी गृह संस्था,
न्यु हिन्द म्हाडा कॉलनी,
कामगार राम भाऊ भोंगळे मार्ग,
भायखळा, मुंबई-४०००१०

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रभारी)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, गोवंडी रेल्वे स्टेशनसमोर, मुंबई ४०० ०४३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (प्रभारी)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, गोवंडी रेल्वे स्टेशनसमोर, मुंबई ४०० ०४३.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रभारी) यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनूपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रभारी), श्री. डॉ. मनोज माने व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी महाव्यवस्थापक (प्रभारी), श्री. कलीमपाशा पठाण उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्रीम. रेशमा नेवरेकर यांना अपेक्षित असणारी माहिती ही तत्कालीन मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका येथे घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत ऑगस्ट २०२२ साली कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना प्रदान केलेली असून त्यात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्यात आलेली आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra